





दैनिक
महाराष्ट्राचा बुलंद आवाज
• छत्रपती संभाजीनगर • जालना • बीड • परभणी • लातूर • नांदेड • धाराशिव • हिंगोली • अहिल्यानगर

# मराठवाडा पत्र

■ संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ■

•बीड(महाराष्ट्र) •वर्ष ५ वे •अंक १२० •बुधवार, दि. ३० जुलै २०२५ •RNI-MAHMAR/2021/80074 •Post: Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-2027 •पान १ •पाने ४ •किंमत ३ रूपये

• dailymarathwadapatra2021@gmail.com • https://marathwadapatra.com • https://epaper.marathwadapatra.com • Mo. 9822152955







# नगरपालिका बांधकाम विभागाच्या किरण देशमुख यांच्या विरोधात तक्रारींचा पाऊस !

## जिल्हाधिकारी साहेब उघडा डोळे बघा नीट ; बोगस कारभार वरती शासनाचा बिनकाम करता घेतो पगार !

### • १५ ऑगस्ट ला विविध संघटना नगरपालिकेच्या विरोधात करणार आंदोलन !

**बीड । प्रतिनिधी**

बीड नगर पालिका बांधकाम विभागा अंतर्गत सन २०२३ ते २०२४ आणि सन २०२४ ते २०२५ या आर्थिक वर्षात १० लाखाच्या आतमधील न.प. फंडातून झालेल्या सिमेंट रस्ते व नाल्याचे काम न करता कोट्यावधीचे बिले काढून भ्रष्टाचार झाला असल्याने या संदर्भात वरीष्ठ अधिकाऱ्यांची चौकशी समिती निर्माण करुन संबंधितावर तात्काळ कार्यवाही करण्यात यावी.

बीड नगर पालिका बांधकाम विभागा अंतर्गत सन २०२३ ते २०२४ आणि सन २०२४ ते २०२५ या आर्थिक वर्षात १० लाखाच्या आतमधील न.प. फंडातून झालेल्या सिमेंट रस्ते व नाल्याचे काम न करता कोट्यावधीचे बिले काढून भ्रष्टाचार झाला असल्याने या कामांचे स्पेशल ऑडीट करण्यात यावे. बीड नगर परिषद हद्दीतील सन २०२३ ते २०२४ आणि सन २०२४ ते २०२५ या आर्थिक वर्षात बीड नगर पालिका हद्दीतील आरक्षित जागांची बेकायदेशीररित्या गुंठेवारी केली गेलेली आहे. ही आरक्षित जागांची गुंठेवारी करण्यामध्ये पालिकेतील वरिष्ठ अधिकाऱ्यांचा हात आहे. त्यामुळे आरक्षित व इतर जागांची झालेली गुंठेवारीची चौकशी करण्यासाठी समिती गठीत करुन संबंधितावर तात्काळ कार्यवाही करावी. बीड नगर पालिका बांधकाम विभागात सोमनाथ सदगर हे उप अभियंता होते, परंतु बोगस अंदाजपत्रकावर सह्या करण्यास अथवा बोगस अंदाज पत्रकांची बीले रेकॉर्ड करण्यास त्यांनी असमर्थता दर्शवल्याने किंवा या सर्व भ्रष्टाचाराच्या प्रकरणात सामील होण्यास नकार दिल्याने मुख्याधिकारी नीता अंधारे यांनी कनिष्ठ अभियंता असणाऱ्या किरण देशमुख यांना अधिकार नसतांना देखील सिमेंट रस्त्याची व नाल्यांची अंदाजपत्रके तयार करण्याचे, त्यावर सह्या करण्याचे व त्या खोट्या अंदाजपत्रकांचे बीले काढण्याचे काम देशमुख यांच्याकडून करून घेतलेले आहे. त्यानंतर सदगर यांचा उप अभियंता पदाचा कार्यभार काढून तो कार्यभार एक ते दीड महिन्यापूर्वी किरण देशमुख यांच्याकडे देण्यात आलेला आहे. त्यामुळे अधिकार नसतांना तयार केली गेलेली बोगस अंदाजपत्रके ही मुख्याधिकारी नीता अंधारे व किरण देशमुख यांनी केवळ न.प. फंडातील पैशाचा भ्रष्टाचार करण्या करीता तयार केली व त्यातून कोट्यावधी रुपयांचा भ्रष्टाचार केला. त्यामुळे हा सर्व पैसा किरण देशमुख व नीता अंधारे यांच्याकडून वसुल करण्यात यावा. किरण देशमुख (सद्य स्थितीतील बांधकाम उप अभियंता) हे बीड नगर पालिका कार्यालयात सतत गैरहजर असतात. त्यांच्या वैयक्तिक फोनचे इनकमींग कॉल कायमस्वरुपी बंद असतात. केवळ व्हॉटस्अॅप कॉलवर ते ठराविक लोकांशीच बोलतात. त्यामुळे नगर पालिका कार्यालयामधील सहा महिन्यापर्यंतचे सीसीटीव्हीचे फुटेज तपासून किरण देशमुख यांच्यावर तात्काळ निलंबनाची कार्यवाही करण्यात यावी. ▶▶ उर्वरित पान २ वर

### देशमुखांची पाठराखण त्या लोकप्रतिनिधीला महाग पडणार

**राज्यात बीड येथील एका प्रकरण लावून धरत राज्यभरात स्वत:ची प्रसिद्धी करून घेणारे एक लोकप्रतिनिधी या किरण देशमुख यांच्या पाठीशी असल्याची चर्चा आहे. बीड शहरातील या गंभीर प्रकरणाकडे जिल्ह्यातील एका लोकप्रतिनिधीने लक्ष देण्याची आवश्यकता नसताना हे महाशय कुस्तीच्या फडा मध्ये पैलवान म्हणून विनाकारण मैदान गाजवत आहेत. विशेष म्हणजे स्वत:ला रगेल उपाधी देत खरंच एका सरकारी अधिकाऱ्याच्या डोक्यावर हात ठेवत सरकारी यंत्रणा त्याच्या पाठीशी घालण्याचा पाप या लोकप्रतिनिधीकडून केले जात आहे. किरण देशमुख याच्या पापाचा घडा भरला असून लवकरच तो फुटणार आहे. बीड शहरातील अनेक संघटना किरण देशमुख यांच विरोधात तक्रारी करत असून १५ ऑगस्ट ला किरण देशमुख यांच्या विरोधात आंदोलन होणार आहे.**



*बीड तहसीलदार चंद्रकांत शेळके यांना मराठवाडा आयकॉन पुरस्कार भेटल्याबद्दल त्यांचा दैनिक मराठवाडा पत्रच्या वतीने शाल श्रीफळ देऊन सत्कार करून पुढील कार्यास शुभेच्छा देताना संपादक दत्तात्रेय नरनाळे, संजय मालानी, शिंदे देवीसिंह , घोडके आदी छायाचित्र दिसत आहेत.*

## विजेचा धक्का लागून दुग्ध व्यावसायिकाचा मृत्यू

**गेवराई । प्रतिनिधी**



कडबा कट्टीतून म्हशीला खाण्यासाठी चारा काढत असताना विद्युत प्रवाह उतरल्याने छत्तीस वर्षे दूध व्यवसायिकाचा जागीच मृत्यू झाला ही घटना शनिवारी दुपारी दोन वाजण्याच्या समूहास गेवराई शहरातील जातेगाव रोड येथे घडली आहे आसाराम लहु थोरात असे मृताचे नाव आहे. शनिवारी दुपारी म्हशीला खाण्यासाठी कडबा कट्टीतून चारा काढत असताना अचानक कडबा कुट्टीतून विद्युत प्रवाह उतरल्याने जागी मृत्यू झाल्याची घटना उघडकीस आली आहे मृतांच्या पश्चात पत्नी दोन मुले एक मुलगी आहे असा परिवार आहे.

# स्व.महादेव मुंडे कुटुंबीयांना न्याय मिळवून देण्यासाठी मनोज जरांगे पाटील मैदानात

## बीडमध्ये १ ऑगस्ट रोजी सर्व धर्मीय सर्वपक्षीय बैठक

**बीड । प्रतिनिधी**

परळी शहरातील व्यापारी महादेव मुंडे यांची अतिशय क्रूरतेने हत्या झाल्यानंतर पोलिसांना अजूनही महादेव मुंडे यांचे मारेकरी सापडत नाहीत. न्याय मिळावा यासाठी महादेव मुंडे यांच्या पत्नी ज्ञानेश्वरीताई मुंडे यांचा गेल्या

अनेक दिवसापासून लढा सुरूच आहे मात्र मुंडे कुटुंबीयांना अजून न्याय मिळालाच नाही. आता मनोज दादा जरांगे पाटील आणि मराठा समाज हेच आपल्याला न्याय मिळवून देऊ शकतात या विश्वासाने ज्ञानेश्वरीताई मुंडे यांनी मराठा योद्धा मनोज दादा जरांगे पाटील यांना हाक दिल्यानंतर मनोज दादा जरांगे पाटील आणि सकल मराठा समाज ज्ञानेश्वरीताई मुंडे यांच्या पाठीशी उभा राहिला आहे. स्व. महादेव मुंडे यांच्या कुटुंबीयांना न्याय मिळवून देण्यासाठी बीड जिल्ह्यातच नाही तर संपूर्ण महाराष्ट्रात मोठे आंदोलन उभे राहणार आहे. स्व. महादेव मुंडे यांना न्याय मिळवून देण्यासाठी दि. १ ऑगस्ट रोजी दुपारी १२ वाजता बीड शहरातील कॅनॉल रोड येथील रामकृष्ण लॉन्स येथे बीड जिल्हा सकळ मराठा समाजाच्या वतीने



सर्व धर्मीय व सर्वपक्षीय बैठकीचे आयोजन करण्यात आले असून या बैठकीला मराठा योद्धा मनोज दादा जरांगे पाटील हे उपस्थित राहणार आहेत. तसेच यावेळी स्व. महादेव मुंडे यांचे कुटुंब सुद्धा उपस्थित असणार आहे. या बैठकीमध्ये आंदोलनाची पुढील दिशा ठरणारा असून महत्त्वपूर्ण विषयावर चर्चा होणार आहे. तरी बीड जिल्ह्यातील सर्वपक्षीय आजी माजी खासदार, आमदार, मंत्री, राज्यमंत्री, जिल्हा परिषद सदस्य, पंचायत समिती सदस्य, नगरसेवक, सरपंच यांच्यासह विविध पक्षातील पदाधिकारी नागरिक यांनी मोठ्या संख्येने या आयोजित बैठकीला उपस्थित रहावे असे आवाहन सकल मराठा समाज बीड जिल्हा यांच्यावतीने करण्यात आले आहे.

# संजय गांधी, श्रावण बाळ पेन्शन धारक वंचित

## प्रदेशाध्यक्ष सुरेश माने यांचे मंत्री अतुल सावे यांना निवेदन

### दिव्यांगांसाठी खास घरकुल योजना, ३ टक्के निधी व पुनर्वसन केंद्रांची मागणी

**बीड । प्रतिनिधी**

राज्यातील हजारो दिव्यांग बांधव विविध योजनांच्या लाभांपासून वंचित राहत असून, शासनाच्या डीबीटी यंत्रणेतील तांत्रिक अडथळ्यांमुळे त्यांना प्रचंड मनस्ताप सहन करावा लागत आहे. या पार्श्वभूमीवर दिव्यांगांच्या हक्कांसाठी लढा उभारणारे रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले)चे नेते सुरेश कौशल्या धर्मराज माने यांनी दिव्यांग कल्याण



विभागाचे मंत्री अतुल सावे यांची भेट घेऊन त्यांना निवेदन दिले आहे. डीबीटीची यंत्रणा सुधारण्यासह दिव्यांगांसाठी खास घरकुल योजना, ३ टक्के निधी व पुनर्वसन केंद्र यासह विविध मागण्यांवर राज्य शासनाने तत्काळ विचार विनिमय करून त्या अमलात आणाव्यात अशी मागणी करण्यात आली आहे. लाभार्थींना थेट अनुदान मिळण्यासाठी शासन डीबीटी ▶▶ उर्वरित पान २ वर



*बीड संचालक श्री.गणेशजी घुमरे सर यांना वाढदिवसानिमित्त शुभेच्छा देताना दैनिक मराठवाडा पत्र चे संपादक दत्तात्रय नरनाळे, अंकुश नखाते सर,भरणे सर, जगताप सर, अॅड. दिपक गायकवाड, रोहन काळे, पंकज गायकवाड आदी छायाचित्र दिसतं आहेत.*

## मयूर बियर बार अँण्ड परमिट रूम हॉटेल मध्ये चोरी

**वडवणी । प्रतिनिधी**

तालुक्यातील वडवणी चिंचवण वरील सोन्नाखोटा फाटा येथील मयूर बियर बार अँण्ड परमिट रूम या हॉटेलमध्ये मध्यरात्री धाडसी चोरी अज्ञात चोरट्यांनी केली आहे. यामध्ये हॉटेलमध्ये ठेवलेले विविध कंपन्यांच्या दारूचे बॉक्स सह सीसीटीव्ही कॅमेऱ्याची सीडीआर स्टोरेज व नगदी कॅश पळवल्याची घटना रविवार रोजी मध्य रात्री घडली आहे. अज्ञात चोरट्या विरुद्ध वडवणी पोलीस स्टेशनला गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सोन्नाखोटा फाटा येथे साधारण १० ते १५ वर्षांपासून संजय बडे यांच्या मालकीचे मयुर ▶▶ उर्वरित पान २ वर



*जालना येथे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ साहेब यांच्या प्रमुख उपस्थिती पिनू डांगे यांचा काँग्रेसमध्ये प्रवेश यावेळी युवा नेते आदित्य दादा पाटील, जिल्हाध्यक्ष राहुल भैया सोनवणे, तालुकाध्यक्ष गणेश दादा बजगुडे व काँग्रेस पक्षाचे इतर पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.*

# गुटका, सिगारेट, तंबाखू, दारू देऊन चाललेला क्लबचा खेळ बंद करण्याचे पोलिस प्रशासना समोर आव्हान

## खेळ चालवणाऱ्यांची मुजोरी पोलिसांच्या हतबलतेमुळे वाढली

**बीड । प्रतिनिधी**

आमचे कोणीच काही करू शकत नाही,पेपर ला बातम्या आल्याने काय होते,बोभाटा करून चोर पकडले जातात का अशी मुजोरी भाषा चोरी करणारेच वापरू लागल्याने हा नियमानुसार दिसणारा अवैध खेळ पोलिस प्रशासन बंद करणार आहेत का? हे मोठे आव्हान पोलिसा समोर उभे असून पोलिसांच्या हतबलतेमुळे यांची मुजोरी वाढत चालली असल्याची जोरदार चर्चा आता होऊ लागली आहे.

आपला खेळ हा नियमानुसार आपण चालवत नाहीत हे माहित असून ही आमचे कोणीच काही करू शकत नाही,पेपर च्या बातम्या आल्याने काय फरक पडतो,जर पोलिस कर्मचारी कल्ब मध्ये तपासणी संदर्भात आले तर त्यांच्यावरच गुन्हे दाखल होऊ



शकतात अशी मग्रुरीची भाषा आता कल्ब चालकातुन करण्यात येऊ लागली आहे. याला पोलिस प्रशासनातील अधिकारी आणि कर्मचारी कारणीभूत आसल्याचे बोलल्या जाऊ लागले आहे. कारण पोलीस प्रशासनाने जर वेळीच यांना आळा घातला असता तर यांची मग्रुरी वाढली नसती, क्लब चालवणारे आम्ही किती शाहू आहोत हे जरी दाखवत असले तरी या ठिकाणी अनियमितता दिसून येते.याठिकाणी येणाऱ्या सभासदांना गुटका,सिगारेट,तंबाखू तर काही सभासदाच्या मागणी वरुण दारू पुरवली जाते हे नियमात बसते का याचे उत्तर मग्रुरी भाषा करणाऱ्या चालकांनी द्यावे,हे सर्व याठिकाणी सुरू असल्याचे पोलिस अधिकारी आणि कर्मचारी यांना माहीत असतांनाही कार्यवाही होत नाही ही शोकांतिका असून प्रशासनाच्या हतबलतेमुळे यांची मुजोरी वाढली असल्याने पोलिस खात्याची प्रतिमा जण सामान्यात डागाळत चालली आहे याचे भान अधिकारी आणि कर्मचारी यांनी बाळगणे गरजेचे आहे.समाजात काय चालले हे दाखवण्याचे काम पत्रकार आणि नागरिक करतात मग पोलिस प्रशासन गप्प का असा सवाल जनता आता करू लागली आहे.



# महाराष्ट्र राज्य गृहनिर्माण धोरण-२०२५ : सर्वांसाठी घराच्या दिशेने वाटचाल

राज्यातील सर्वांना घरे मिळावीत, पुनर्विकास प्रकल्पांना चालना मिळावी, झोपडपट्टीमुक्त राज्य व्हावे, शाश्वत आणि समावेशक शहरीकरण व्हावे या उद्देशाने राज्य शासनाने महाराष्ट्र राज्य गृहनिर्माण धोरण- २०२५ लागू केले आहे. सन २०३० पर्यंत सर्वांसाठी सुरक्षित, परवडणारे आणि समावेशक घर उपलब्ध करून देण्याचा या धोरणाचा उद्देश आहे. राज्यातील विकासात पायाभूत सुविधांप्रमाणेच गृहनिर्माण क्षेत्राचा मोठा हातभार आहे. राज्याच्या गृहनिर्माण धोरणामुळे राज्याच्या गृहनिर्माण क्षेत्राला गती मिळेलच त्याच प्रमाणे आर्थिक विकासाला चालना मिळेल.

अठरा वर्षांनंतर जाहीर झालेल्या या धोरणात विदाआधारित निर्णय प्रक्रिया, आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर, गतिमानता व पारदर्शकता आणि सामाजिक समावेशकता यावर भर दिला आहे. या धोरणाच्या 'माझं घर, माझा अधिकार' या ब्रिदवाक्यातून सर्वांसाठी घरे या स्वप्नांची पूर्तता होण्याच्या दृष्टिने वाटचाल होईल. या धोरणामध्ये सामाजिक समावेशकता, शाश्वतता, परवडणारी घरे व पुनर्निर्माणशिलता या मूलभूत तत्वांचा विचार केला आहे.

असे आहे गृहनिर्माण धोरण 2025

प्रस्तावना, धोरणाची गरज व आवश्यकता –

महाराष्ट्र हे भारतातील दुसरे सर्वाधिक लोकसंख्या असलेले आणि क्षेत्रफळानुसार तिसरे राज्य आहे, जे देशाच्या एकूण सकल देशांतर्गत उत्पादनात 13 टक्के योगदान देणारे एक अत्यंत गतिशील आर्थिक केंद्र म्हणून ओळखले जाते. औद्योगिकीकरण, सेवा क्षेत्रातील प्रगती आणि पायाभूत सुविधा विकासामुळे सध्या राज्याचे शहरीकरणाचे प्रमाण 45 टक्के इतके असून, मुंबई, पुणे, नागपूर आणि नाशिक यांसारखी प्रमुख शहरे शहरी विकासाच्या केंद्रस्थानी आहेत. राज्यात 29 महापालिका, 244 नगर परिषद आणि 147 नगर पंचायतींच्या माध्यमातून शहरी प्रशासन कार्यरत आहे.

"सर्वांसाठी घर" आणि "झोपडपट्टीमुक्त महाराष्ट्र" ही उद्दिष्टे साध्य करण्यासाठी हे नवीन गृहनिर्माण धोरण तयार करण्यात येत आहे. या धोरणात आर्थिकदृष्ट्या दुर्बळ घटक (EWS), अल्प उत्पन्न गट (LIG) आणि मध्यम उत्पन्न गट (MIG) यांच्यावर लक्ष केंद्रित करणे आवश्यक आहे.

हे धोरण "माझं घर, माझा अधिकार" या मूलभूत मार्गदर्शक तत्त्वावर आधारित आहे, जे २०३० पर्यंत राज्याच्या दृष्टिकोनाशी सुसंगत आहे.

२००७ नंतरच्या गृहनिर्माण धोरणातील महत्त्वाचे बदल, जसे की मुंबईसाठी लागू करण्यात आलेले विकास नियंत्रण आणि प्रोत्साहन नियम (DCPR) आणि उर्वरित राज्यासाठी लागू करण्यात आलेले एकात्मिक विकास नियंत्रण आणि प्रोत्साहन नियम (UDCPR) यांचा विचार करण्यात आला आहे.

कोविड-१९ (COVID-19) महामारीच्या काळात मजुरांचे झालेले स्थलांतर, घरापासून कामाच्या ठिकाणी ये-जा करण्याच्या समस्यांमुळे मजुरांना त्यांच्या कामाच्या ठिकाणी घर उपलब्ध करून देणे गरजेचे झाले आहे.

बांधकाम खर्च कमी करण्यासाठी नवीन तंत्रज्ञानाचा वापर करणे आणि हवामान बदलामुळे पर्यावरणावर परिणाम करणाऱ्या घटकांचा गृहनिर्माण क्षेत्रात समावेश करणे आवश्यक झाले आहे.

गृहनिर्माण विभागाने झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण (SRA), महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण (म्हाडा), महाराष्ट्र स्थावर संपदा नियामक प्राधिकरण (महारेरा), शिवशाही पुनर्वसन प्रकल्प मर्यादित (SPPL) यांसारख्या विविध शासकीय संस्था, संघटना, विकासक आणि विषय तज्ज्ञांशी सविस्तर चर्चा करून हे धोरण तयार केले आहे. धोरणाचा मसुदा २५ सप्टेंबर २०२४ रोजी संकेतस्थळावर प्रसिद्ध करून हरकती/सूचना मागवण्यात आल्या होत्या आणि सुमारे १८०० हरकती/सूचनांचा विचार करून हे धोरण अंतिम करण्यात आले.

राज्याने या धोरणात स्वतःला 'सुविधाकार, उत्प्रेरक, गृहशिल्पी (बिल्डर) आणि नियामक' म्हणून स्थान दिले आहे.

धोरणाची उद्दिष्टे आणि तत्त्वे – या धोरणाचे उद्दिष्ट वस्तुनिष्ठ विदा (डेटा) आधारित निर्णय प्रक्रिया आणि नवीन तंत्रज्ञानाचा वापर करून शाश्वत, परवडणारी, पर्यावरणपूरक आणि हवामान बदल सहनशील निवास व्यवस्था निर्माण करणे आहे.

अ. धोरणाची उद्दिष्टे

गृहनिर्माण सुलभता : २०३० पर्यंत सर्वांसाठी परवडणारी, पर्यावरणपूरक व आधुनिक घरे उपलब्ध करून देऊन गृहनिर्माण सुलभतेचा उद्देश साध्य करणे.

गृहनिर्माण गरज सर्वेक्षण व विश्लेषण : २०२६ पर्यंत राज्यभर, जिल्हा-निहाय गृहनिर्माण सर्वेक्षण करून पुराव्यावर आधारित नियोजन करणे.

आर्थिक वृद्धी व गतिमानता : गृहनिर्माण क्षेत्राचा आर्थिक वाढीस चालना देणारा घटक म्हणून विकास करणे, रोजगार निर्मिती व संबंधित उद्योगांना पाठबळ देणे.

पर्यावरणीय शाश्वतता : गृहनिर्माणासाठी पर्यावरणपूरक साहित्य व तंत्रज्ञानाच्या वापरास प्रोत्साहन देणे.

परवडणारी घरे : राज्यातील अतिदुर्बल घटकांसाठी परवडणाऱ्या, शाश्वत, सुरक्षित घरांची निर्मिती करणे.

झोपडपट्टी पुनर्वसन : झोपडपट्ट्यांचा पुनर्विकास करणे व राहणीमान सुधारण्यासाठी प्रयत्न करणे, झोपडपट्टीमुक्त महाराष्ट्र साध्य करणे.

शहरी नियोजन व पायाभूत एकात्मिक सुविधांचा विकास : गृहनिर्माणास रस्ते, पाणी, मलनिःस्सारण इत्यादी आवश्यक पायाभूत सुविधांशी जोडून संघटित विकास साधणे.

'वॉक टू वर्क' संकल्पनाः गृहनिर्माण व रोजगाराच्या संधी यांचा परस्परासंबंध प्रस्थापित करून प्रवासाचा वेळ कमी करणे.

नियमन व अंमलबजावणीः दर्जा, सुरक्षितता व परिणामकारक देखरेख सुनिश्चित करण्यासाठी गृहनिर्माण क्षेत्रातील नियमन अद्ययावित करणे.

भाडे तत्त्वावरील गृहनिर्माण : प्रोत्साहन व सक्षम नियामक आराखड्याद्वारे राज्यात भाडे तत्त्वावरील घरांच्या वाढीवर लक्ष केंद्रित करणे.

सर्वसमावेशक वाढ : ज्येष्ठ नागरिक, विद्यार्थी, नोकरदार महिला व औद्योगिक कामगार यांच्यासाठी विशिष्ट गरजांचा विचार करणे.

आधुनिक तंत्रज्ञान : टिकाऊ, किफायतशीर व पर्यावरणपूरक तंत्रज्ञानाच्या वापरास प्रोत्साहन देणे.

स्वशासकीय संस्था व विचारवंतांचा सहभाग : धोरण अधिक लोकाभिमुख व भविष्यवेधी बनवण्यासाठी स्वशासकीय संस्था व विचारवंतांचा सहभाग.

ब. धोरणाची तत्त्वे – परवडणारी, सर्वसमावेशक, शाश्वत आणि पुनर्निर्माणशील ही या धोरणाची चार मुख्य तत्त्वे आहेत.

परवडण्याजोगे : परवडणाऱ्या दरात जमीन, चटई क्षेत्र निर्देशांक (FSI) प्रोत्साहन, शुल्कात सवलत इत्यादींद्वारे घरांची उपलब्धता सुनिश्चित करणे.

आर्थिक सहाय्य व गृहनिर्माणासाठी वित्त पुरवठा करून स्वस्त किमतीत घरे उपलब्ध करणे.

बांधकाम स्वस्त असले तरी गुणवत्ता आणि सुरक्षिततेचे किमान निकष पाळणे.

सर्वसमावेशक : आर्थिकदृष्ट्या दुर्बळ घटक (EWS) आणि अल्प उत्पन्न गट (LIG) यांच्यासाठी सामाजिक गृहनिर्माण व आर्थिक सहाय्य.

ज्येष्ठ नागरिक आणि शारीरिकदृष्ट्या विकलांग रहिवाशांना सर्व गृहनिर्माण प्रकल्पांमध्ये सुलभ प्रवेश सुनिश्चित करणे.

नोकरदार महिला आणि विद्यार्थ्यांसाठी सुरक्षित, परवडणाऱ्या आणि दर्जेदार घरांची उपलब्धता सुनिश्चित करणे.

शाश्वत : गृहनिर्माण बांधकामादरम्यान पर्यावरणपूरक आणि टिकाऊ पद्धतींचा वापर सुनिश्चित करणे ("कमी वापर, पुनर्वापर व पुनर्निमाणशील" – Reduce, Reuse, Recycle).

ऊर्जा कार्यक्षमता, नूतनीकरणक्षम ऊर्जा एकत्रीकरण, जलसंधारण, शाश्वत व पुनर्प्रक्रिया केलेल्या सामग्रीचा वापर, कार्यक्षम जागेचे नियोजन यास प्रोत्साहन.

हरित इमारत मानकांचा समावेश करणे आणि हरित इमारत प्रमाणपत्रांसाठी प्रोत्साहन देणे.

पुनर्निर्माणशील : हवामान बदल विचारात घेऊन, पर्यावरणाचा ऱ्हास कमी करणारे, आपत्तींमुळे होणारी हानी मर्यादित करणारे आणि आपत्तीनंतर पुनर्निर्माण सुलभ करणारे गृहनिर्माण आवश्यक आहे.

यात जमिनीचा सक्षम वापर, पर्यावरणपूरक इमारतींचे नियोजन, टिकाऊ बांधकाम साहित्य, पूररोधक व पूरनियंत्रण नियोजन, उष्मारोधक बांधकाम साहित्य, तंत्र व तंत्रज्ञान यांचा समावेश होतो.

३. धोरणात्मक उपाय धोरणात्मक उपायांमध्ये अनेक पैलूंचा समावेश आहेः अ. डेटा-आधारित निर्णय

गृहनिर्माण गरज व मागणी सर्वेक्षणः राज्य सरकार संपूर्ण राज्यभर गृहनिर्माण गरजेचे मूल्यांकन करण्यासाठी व्यापक सर्वेक्षण राबवणार आहे, जे 2026 पर्यंत पूर्ण करण्याचे उद्दिष्ट आहे. यामुळे प्रत्येक जिल्हा-निहाय गृहनिर्माण गरज समजून घेण्यास मदत होईल.

राज्यस्तरीय गृहनिर्माण माहिती पोर्टलची निर्मिती (SHIP): गृहनिर्माण क्षेत्रासाठी डेटा-आधारित धोरण आणि निर्णय प्रक्रिया राबवण्यासाठी "राज्य गृहनिर्माण माहिती पोर्टल (SHIP)" विकसित करणे प्रस्तावित आहे. यात मागणी आणि पुरवठा दोन्ही बाजूंनी डेटा संकलित करून विश्लेषण केले जाईल. हे पोर्टल जिल्हास्तरीय भूमी निधी कोष (Land Bank) आणि विविध योजनांची माहिती उपलब्ध करून देईल, ज्यामुळे पारदर्शकता आणि गतिशीलता वाढेल.

निवासी वापरासाठी योग्य शासकीय जमिनींची भूमी निधी कोष आधारसामग्री तयार करणेः सार्वजनिक प्राधिकरणांद्वारे गृहनिर्माण करताना उपलब्ध शासकीय/निमशासकीय प्राधिकरणांच्या जमिनींची माहिती एकत्रित स्वरूपात उपलब्ध झाल्यास गृहनिर्माण योजनांचे नियोजन सुलभ होते. यासाठी राज्यव्यापी सर्वेक्षण करून भूमी निधी कोष तयार करण्याचे उद्दिष्ट ३१ मार्च २०२६ पर्यंत पूर्ण करायचे आहे.

ब. परवडणाऱ्या गृहनिर्माण साठ्याची निर्मिती – राज्याने 2030 पर्यंत आर्थिकदृष्ट्या दुर्बळ घटक (EWS) आणि अल्प उत्पन्न गट (LIG) यांच्यासाठी ३५ लाख घरे बांधण्याचे लक्ष्य ठेवले आहे, ज्यासाठी ७०,००० कोटी रुपयांची गुंतवणूक अपेक्षित आहे. पुढील १० वर्षांत ५० लाख घरांच्या निर्मितीचे उद्दिष्ट आहे.

नवीन गृहनिर्माण (Green Field Development):

सर्वसमावेशक गृहनिर्माण (Inclusive Housing) : १० लाख व त्यापेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या महापालिका हद्दीतील ४००० चौ.मी. पेक्षा जास्त क्षेत्राच्या भूखंडावरील प्रकल्पांमध्ये किमान 20% बांधकाम क्षेत्र म्हाडाकडे वितरण करणे अनिवार्य आहे. शासनाने सर्वसमावेशक गृहनिर्माणांतर्गत किमान 5 लाख घरांच्या निर्मितीचे लक्ष्य ठेवले आहे.

औद्योगिक कामगारांसाठी गृहनिर्माणः कामगारांना त्यांच्या कामाच्या ठिकाणाजवळ सुरक्षित, परवडणारी घरे उपलब्ध होणे आवश्यक आहे, त्यामुळे प्रवासाचा खर्च वाचेल आणि उत्पन्नात वाढ होईल. "वॉक टू वर्क" संकल्पनेनुसार, एमआयडीसी (MIDC) क्षेत्रात १०% ते ३०% जमीन गृहनिर्माणासाठी राखीव ठेवण्यात यावी.

ज्येष्ठ नागरिकांसाठी गृहनिर्माणः सन 2036 पर्यंत महाराष्ट्रात ज्येष्ठ नागरिकांची लोकसंख्या १७% पर्यंत पोहोचण्याचा अंदाज आहे. ज्येष्ठ नागरिक गृहनिर्माणाला इमारतीच्या वापरासाठी एक स्वतंत्र प्रवर्ग म्हणून ओळखले जाईल. या प्रकल्पांसाठी विविध प्रोत्साहन दिले जातील.

विद्यार्थ्यांसाठी गृहनिर्माणः शहरांमध्ये स्थलांतरित विद्यार्थ्यांचा ओघ वाढत आहे. विद्यार्थ्यांसाठी विकसित केलेली सर्व गृहनिर्माण मालमत्ता केवळ भाडे करारावरच वितरित केली जाईल. विद्यापीठाजवळच्या जागेत विद्यार्थी गृहनिर्माणासाठी क्षेत्र निश्चित केले जाईल.

नोकरदार महिलांसाठी गृहनिर्माणः महाराष्ट्रातील महिला कामगार वर्गाचा सहभाग 31% आहे. नोकरदार महिलांसाठी विकसित केलेली सर्व गृहनिर्माण मालमत्ता केवळ भाडे करारावरच वितरित केली जाईल. प्रमुख नोकरी केंद्रांपासून ५ किलोमीटर अंतरावर ही गृहनिर्माण केंद्रे असतील.

एकात्मिक वसाहतींमध्ये परवडण्याजोगी गृहनिर्माण (Integrated Township Policy): ४० हेक्टर (100 एकर) किंवा त्याहून अधिक क्षेत्रावर एकात्मिक वसाहत प्रकल्प (ITP) राबवण्यास परवानगी आहे, ज्यात किमान १५% मूळ निवासी चटई क्षेत्र निर्देशांक सामाजिक गृहनिर्माणासाठी राखीव असेल.

प्रकल्पबाधित व्यक्तींसाठी गृहनिर्माण (PAP Housing): प्रकल्पबाधित लोकांसाठी पर्यायी घर, निश्चित भरपाई आणि उपजीविकेसाठी सहाय्य प्रदान करण्याची तरतूद सुनिश्चित केली जाते. मुंबईतील विविध पायाभूत सुविधा प्रकल्पांसाठी अंदाजे 50,000 प्रकल्पबाधित व्यक्तींसाठी घरांची आवश्यकता आहे. तसेच मुंबई विकास आराखड्याची अंमलबजावणी करण्यासाठी 2,20,000 घरांची गरज असल्याचे टास्कफोर्सच्या निर्दशनास आले आहे.

मध्यम उत्पन्न गटांसाठी परवडण्याजोगी गृहनिर्माण (MIG Housing): शासनाने मध्यम उत्पन्न गटासाठी परवडणारी घरे उपलब्ध करून देण्यासाठी खाजगी बाजारपेठांना प्रोत्साहन देण्याची योजना आखली आहे. यात निवास खरेदीसाठी व्याज सवलत, अधिमूल्य व विकास शुल्क विकासक हप्त्यांमध्ये शुल्क भरण्याची मुभा या उपाययोजनांचा समावेश.

शासकीय कर्मचारी आणि विशेष प्रवर्गासाठी गृहनिर्माण योजना : शासकीय कर्मचारी आणि विशेष प्रवर्गातील (माजी सैनिक, स्वातंत्र्यसेनानी, दिव्यांग व्यक्ती, कलाकार, पत्रकार इ.) घटकांसाठी विशेष गृहनिर्माण योजना राबवण्याचे प्रयत्न केले जातील. तसेच मुंबईसारख्या शहरांमध्ये आरोग्य सेवेसाठी प्रमुख रुग्णालयांजवळ रुग्णांच्या नातेवाईकांसाठी भाडेतत्वावर गृहनिर्माण करणे तसेच नवीन प्रस्तावित विमानतळांजवळ कामगारांसाठी गृहनिर्माण योजना राबविणे प्रस्तावित आहे.

परवडण्याजोगी भाडे तत्त्वावरील गृहनिर्माणः परवडणाऱ्या भाड्याच्या घरांच्या गरजेसाठी धोरणात्मक उपाययोजना प्रस्तावित आहेत, ज्यात खाजगी विकासकांना करात सूट, सबसिडी आणि नियमांमध्ये शिथिलता यांचा समावेश आहे.

पुनर्विकास (Brown Field Development):

स्वयं-पुनर्विकास (Self-Redevelopment): जुन्या व मोडकळीस आलेल्या इमारतींच्या गृहनिर्माण संस्थांना स्वयं-पुनर्विकासासाठी प्रोत्साहन दिले जाते. पात्र प्रकल्पांना अतिरिक्त १०% चटई क्षेत्र निर्देशांक मिळेल. तसेच 9 मीटरपेक्षा कमी रुंदी असलेल्या रस्त्यालगतच्या भूखंडासाठी 0.4 टक्के चटईक्षेत्र मोफत देण्यात येईल, यासह इतर सवलती, प्रोत्साहने उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. यासाठी स्वयं-पुनर्विकास कक्षाची स्थापना करण्यात येणार आहे. यामार्फत सहकारी गृहनिर्माण संस्थांना आवश्यक ते सर्व सहाय्य करण्यात येईल.

समूह पुनर्विकास (Cluster Redevelopment): शहरीकरणाच्या प्रक्रियेत एकल इमारतींचा पुनर्विकास न करता समूह पुनर्विकास केल्यास नागरी पुनरुत्थानाची प्रक्रिया अधिक समाजाभिमुख होते.

जुन्या आणि मोडकळीस आलेल्या इमारतींचा पुनर्विकास – याअंतर्गत एमएमआर साठी तयार करण्यात येणाऱ्या आर्थिक मास्टर प्लॅन अंतर्गत 10 लाख परवडणाऱ्या घरकुलांची निर्मिती करणे आणि त्यासाठी पुनर्विकासाला प्रोत्साहण देण्यात येणार आहे.तसेच म्हाडाच्या वसाहती, जुन्या भाड्याने दिलेल्या इमारती तसेच उपकरप्राप्त इमारतींचा पुनर्विकास करण्यासाठी विविध उपाययोजना प्रस्तावित केल्या आहेत.

झोपडपट्टी पुनर्वसन व पुनर्विकास (Slum Rehabilitation & Redevelopment): या अंतर्गत मोठ्या खासगी जमिनीच्या भूखंडावर झोपडपट्टी पुनर्विकास प्रकल्पांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी अतिरिक्त तरतुदी प्रस्तावित करण्यात आल्या आहेत. यामुळे झोपडपट्टी रहिवाशांची संमती आवश्यक नाही, विकासकाकडे योजना वेळेत पूर्ण करण्यासाठी पुरेसा निधी उपलब्ध राहिल तसेच मोठ्या क्षेत्रामुळे झोपडपट्टी रहिवाशांसाठी पर्यायी संक्रमण शिबिरांची तरतूद होईल.

मुंबई महानगर प्रदेश क्षेत्रामध्ये नवीन झोपडपट्ट्या निर्माण होऊ नयेत, यासाठी गृहनिर्माण विभागात विशेष अंमलबजावणी विभाग स्थापन करण्यात येणार आहे.

◆ पान ९ वरून पुढे...

## नगरपालिका बांधकाम...

बीड नगरपालिकेच्या विविध कामांच्या विरोधात लोकप्रतिनिधीसह आमदार संदीप क्षीरसागर यांनीही अनेक तक्रारी केल्या आहेत. मात्र मुख्य अधिकारी यांना लोकप्रतिनिधी पत्रकार सम ाजसेवक यांच्यासह नागरिकांच्या तक्रारीचे देणे घेणे लागत नसल्याचे दिसून येत आहे. नगरपालिका सतत गैरहजर असलेल्या अभियंता किरण देशमुख यांना पाठबळ देण्याचे काम मुख्याधिकाऱ्याकडून होत आहे का ? किरण देशमुख यांच्या पाठीशी कोणती शक्ती कार्यरत आहे याचा तपास होणे आवश्यक असून बीड जिल्ह्यात शासकीय अधिकाऱ्याची पाठराखण करणारा तो आका कोण ?

बीड नगरपालिकेच्या बांधकाम विभागाचा नगरपालिका फंडातून केलेल्या विकास कामांचा विशेष आर्थिक परीक्षण करण्याची गरज निर्माण झाली आहे. बीड शहरातील विविध विकास कामांत झालेला गोंधळ व गुत्तेदारांना काढलेली बिले यामध्ये घेतलेली टक्केवारी यासह बिलात घुसवलेले अनधिकृत बोगस बिले याचा पूर्ण तपशील जिल्हाधिकाऱ्यांनी तपासण्याची गरज निर्माण झाली आहे. नगरपालिकेच्या विरोधात तक्रार करताना जिल्हाधिकारी यांच्याकडून पुरावे मागितले जात आहे. विशेष म्हणजे नगरपालिकेकडे दिलेली बिले व अंदाजपत्रक याची माहिती मागितली असता नगरपालिका ही माहिती देत नसल्याने जिल्हाधिकाऱ्यांनीच या सर्व संचिका मागून घेत तपास करावा. येत्या १५ ऑगस्टला विविध संघटना मुख्याधिकारी नीता अंधारे व बांधकाम विभागाचे अभियंता किरण देशमुख यांच्या विरोधात आंदोलन करणार असल्याने जिल्हा प्रशासनाने तत्काळ याची दखल घेत नगरपालिका प्रशासनाच्या विरोधात चौकशी समि ती गठित करावी. थर्ड पार्टी कडून नगरपालिकेचा आर्थिक परीक्षण करण्यात यावा.

## संजय गांधी....

यंत्रणा वापरत आहे. मात्र दिव्यांग बांधवांना डीबीटी करताना प्रचंड त्रास होत आहे. ही यंत्रणा अत्यंत संथगतीने कार्यरत असल्याम ुळे लाभार्थींना अनेकवेळा कार्यालयांचे उंबरे झिजवावे लागत आहेत. त्यामुळे संजय गांधी निराधार योजना, श्रावण बाळ योजना यांसारख्या महत्त्वाच्या योजनांचे लाभ लाभार्थींपर्यंत पोहोचत नाहीत, संजय गांधी व श्रावण बाळ योजनेंतर्गत मिळणाऱ्या पेन्शनमध्ये शासनाने एक हजार रूपये वाढ केलेली आहे. ही वाढ तत्काळ मिळवी, डीबीटी अभावी थकलेले सहा महिन्यांचे अनुदानही तत्काळ देण्यात यावे, दिव्यांग बांधवांसाठी स्वतंत्र घरकुल योजना राज्य सरकारने सुरु करावी, दिव्यांग मंत्रालयाच्या पद भरती प्रक्रिया त्वरीत पार पाडावी, व्यवसायासाठी मिळणारे बीज भांडवल १.५ लाख रुपयांवरून ३ लाख रुपये करण्यात यावे, अशी ठाम भूमिका माने यांनी घेतली आहे. याशिवाय प्रत्येक जिल्हा नियोजन समितीमध्ये राजकीय पक्षाचा विचार न करता होतकरू दिव्यांग बांधवांना स्थान देण्यात यावे, आणि १ टक्का निधीतील वाटा वाढवून तो किमान ३ टक्के करण्यात यावा, प्रत्येक जिल्ह्यात दिव्यांग भवन उभारण्यासाठी शासनाने जागा उपलब्ध करून त्यासाठी विशेष निधीची तरतूद करावी, पुनर्वसन केंद्रांची उभारणी तातडीने करण्यात यावी. या महत्वाच्या मागण्यांवर शासनाने तत्काळ विचार विनिमय करून त्या अमलात आणाव्यात अशी म ागणी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले गट) प्रदेशाध्यक्ष सुरेश माने यांनी केली आहे.

## मयूर बियर ....

बियर बार अँण्ड परमिट रूम हे हॉटेल कार्यरत आहे. सदरील हॉटेल रात्री साडे दहा ते अकराच्या दरम्यान बंद करण्यात आले होते. यानंतर मध्यरात्री २ ते २.३० वाजेच्या दरम्यान अज्ञात चोरट्यांनी हॉटेलचे प्रवेशद्वार असणाया शटरचे कुलूप तोडून आत मध्ये प्रवेश केला. चोरी हे सीसीटीव्ही कॅमेर्यात दिसू नये यासाठी पहिले लाईट बंद केली. नंतर शटर चे लॉक तोडून आत मध्ये प्रवेश केला. हॉटेलमध्ये ठेवलेल्या विविध कंपन्यांच्या दारूचे बॉक्स त्याची अंदाजे किंमत १४४३८९रु दारू नगदी ५६०० असा एकून १५०३८९ रुपयाचा म ाल ल अज्ञात चोरट्यांनी चोरून नेण्याची घटना रात्री घडली आहे. याप्रकरणी हॉटेल मॅनेजर केशव शेवते यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरटेविरुद्ध वडवणी पोलिस स्टेशनमध्ये वडवणी पोलिसात गुन्हा दाखल केला आहे.

◆ पान ४ वरून पुढे...

## शाळेमध्ये घुसून...

सीसीटीव्ही फुटेज वरून सर्व आरोपी निष्पन्न झाले आहे. या १५ आरोपी पैकी आठ प्रमुख आरोपी यांना पोलिसांनी जेरबंद केले आहे. गुन्हा दाखल केल्या पासून काही आरोपी फरार होते. त्यातील चार आरोपी हे अल्पवयीन असल्याने त्यांना पालकांच्या ताब्यात दिली आहे.

अटक झालेल्या आरोपींची नावे खालील प्रमाणे आहेत.. १. अनेश नरेश गायकवाड वय २५ वर्ष, २ साहिल नरेश गायकवाड व २१ वर्ष, ३. शेखर रत्नाकर जाधव वय ३१ वर्ष, आकाश पालकर जाधव वय ३९ वर्ष. सर्व राहणार पात्रुड गल्ली अशी आहेत. यातील दोघेजण हे अभिलेखावरील गुन्हेगार आहे आणि त्यांच्यावर अगोदरच मारहाणीची गुन्हे दाखल आहेत. अशा गुन्हेगारांवर तडीपारीची कारवाई करण्यात येणार असल्याचे पोलिस अधीक्षक श्री नवनीत काँवत यांनी सांगितले आहे अशा घटना पुन्हा होऊ नये यासाठी पोलीस अधीक्षक नवनीत काँवत यांनी आरोपी अटकेबाबत सविस्तर सूचना दिल्या होत्या. सदरील कामगिरी ही पोलीस अधीक्षक श्री नवनीत काँवत, अपर पोलीस अधीक्षक श्री सचिन पांडकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस ठाणे बीड शहरचे पोलीस निरीक्षक शितलकुमार बल्लाळ, पोउपनि महेश जाधव, पो.ह. संजय राठोड, गहिनीनाथ बावनकर, राम पवार, बापू गायकवाड यांनी केली आहे.

## सेवाजेष्ठता डावलून...

मिळाली असा स्वतचा विनंती अर्ज सादर केला. त्या अनुषंगाने त्यांना तात्पुरत्या स्वरुपात पदस्थापना दिली अशा पध्दतीने सेवाजेष्ठता डावलून कागदी घोडे नाचवून तात्पुरती पदोन्नती प्राप्त करून घेतली व पुढे दिनांक १६/०२/२०१८ रोजीचा आधार देत न्यायालयाकडून हे प्रकरण पदोन्नतीस संरक्षण देत निकाली काढले. वास्तविक तिथेही दिशाभूल केली गेली. कारण हे प्रकरण पदोन्नतीचे नव्हतेच ते प्रकरण अनाधिकृत, सेवाजेष्ठता डावलून दिले गेले होते. यावेळी जिल्हा परिषदेच्या वकीलाची भुमीका महत्वाची होती ती त्यांनी ठोस भुमिका घेतली असती तर त्या संदर्भातील सेवा जेष्ठावर अन्याय झाला नसता. आता हे तेच केंद्रप्रमुख सेवा जेष्ठता डावलून जेष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी पदासाठी फिल्डींग लावून बसले आहेत. वास्तविक पाहताना जेष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी पदावर नियुक्तीसाठी बी.एड्. झाल्याची सेवा जेष्ठता ग्राह्य धरणे अपेक्षित आहे. सेवा प्रवेशाची नाही. त्यामुळे बी.एड्.च्या सेवा जेष्ठतेच्या निकषाने फक्त माध्यमिक शिक्षकच सेवा जेष्ठतेने येतात. म्हणून त्या केंद्रप्रमुखांना पदोन्नती देताच येत नाही. उलट जिल्हा परिषदेने अनाधिकृतपणे पदोन्नती घेणार्या विरूध्द कारवाई करणे अपेक्षित आहे असे बहुजन विकास मोर्चाचे जिल्हाध्यक्ष प्रशांत ससाणे यांनी म्हटले आहे.

## श्री क्षेत्र गोरक्षनाथ...

विना पूजन, मृदुंग पूजन, हार्मोनियम पूजन हे होईल. या नंतर फ ुल टाकण्याचा कार्यक्रम होऊन व्यासपीठ पूजन होईल. अखंड हरिनाम सप्ताह आरंभ होईल. दि. ०२ऑगस्ट शनिवार रोजी रात्री ०९ ते ११वा. या वेळेत ह.भ.प समाजप्रबोधनकार निवृत्ती म. इंदोरीकर यांचे कीर्तन दि. ०३ ऑगस्ट रविवार रोजी ह.भ.प ज्ञानेश्वर महाराज सांगळे यांचे कीर्तन, दि ०४ ऑगस्ट सोमवार रोजी ह.भ.प. शंकर महाराज शेवाळे, ०५ ऑगस्ट मंगळवार सचिन महाराज ढोले, दि ०६ऑगस्ट बुधवार ह.भ.प. विशाल महाराज खोले, दि. ०७ ऑगस्ट गुरुवार रोजी ह.भ.प.जगन्नाथ महाराज पाटील, दि.०८ ऑगस्ट शुक्रवार रोजी ह.भ.प.विश्वनाथ महाराज वारिंगे कोकणरत्न यांचे कीर्तन सेवा होणार आहे. दि. ०९ ऑगस्ट शनिवार रोजी १२ ते ०२ वा. ह.भ.प. संजयजी महाराज पाचपोर, रामायणाचार्य बुलढाणा विदर्भ यांचे काल्याचे कीर्तन होईल व नंतर महाप्रसादाचा कार्यक्रम होणार आहे.

## सन उत्सवातून...

जतन करणे – निसर्गाचे तसेच प्राण्यांचे रक्षण करणे हे प्रत्येक मानवाचे आद्यकर्तव्य असल्याचेही अॅड विकास जोगदंड यांनी यावेळी उपस्थितांना सांगितले. याप्रसंगी जेष्ठ नागरिक किसन (तात्या) जोगदंड, अप्पा जोगदंड,महादेव (तात्या) जोगदंड, सिद्धार्थ कदम, मंगेश जोगदंड, राजेशभाई कोकाटे, जीवनराव वाघमारे, राजू जोगदंड, कैलास ठोकळ, महेंद्र वंजारे, लखन जोगदंड, चंद्रकांत जोगदंड, गोरख जोगदंड, अतुल कोरडे, संदेश गायकवाड, महादेव वंजारे, बालु इनकर, साहिल गायकवाड, आदर्शराजे जोगदंड, आदित्यराजे जोगदंड, आदेश जोगदंड, मुन्ना जोगदंड,सह आदी उपस्थित होते.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com
हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक – दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

# ठाणे जिल्हा रुग्णालय एमएमआर मधील नागरिकांसाठी वरदान ठरणार: उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे

## राज्यातील महापालिका रुग्णालयांमध्ये महिलांसाठी कर्करोग तपासणीची मोहीम हाती घ्यावी

**मुंबई । प्रतिनिधी**


ठाणे जिल्हा रुग्णालयाचे काम तातडीने पूर्ण करून नागरिकांच्या सेवेसाठी ते लवकरात लवकर दाखल झाले पाहिजे यादृष्टीने कामाला गती द्यावी. हे रुग्णालय मुंबई महानगर प्रदेशातील नागरिकांसाठी वरदान ठरणार असून अद्ययावत यंत्रसामग्री घेतानाच १०७८ नवीन पदभरतीची प्रक्रिया देखील सुरू करावी, असे निर्देश उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिले. दरम्यान, राज्यातील महापालिका रुग्णालयांमध्ये प्रतिबंधात्मक उपाय म्हणून महिलांसाठी कर्करोग तपासणीची मोहीम घेण्याचे निर्देशही उपमुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी दिले.



मंत्रालयातील समिती कक्षात उपमुख्यमंत्री श्री. शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत ठाणे जिल्हा सामान्य रुग्णालयाच्या बांधकामाचा आढावा घेण्यात आला. यावेळी सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर, उपमुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव असीम गुप्ता, प्रधान सचिव नविन सोना, आरोग्य विभागाचे सचिव निपुन विनायक, विरेंद्र सिंह, वित्त विभागाच्या सचिव ए. शैला, आरोग्य विभागाच्या आयुक्त कादंबरी बलकवडे, ठाण्याचे जिल्हाधिकारी अशोक शिनगारे, आरोग्य संचालक, सहसंचालक, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. कैलाश पवार आदी उपस्थित होते. ठाणे जिल्हा रुग्णालया अद्ययावत होत असून त्यामध्ये ५०० खाटांचे जिल्हा रुग्णालय, २०० खाटांचे महिला रुग्णालय आणि २०० खाटांचे संदर्भ सेवा रुग्णालय असे एकूण ९०० खाटांचे हे रुग्णालय तयार होत आहे. त्याचे ८० टक्के बांधकाम पूर्ण झाले असून विद्युतीकरण, यंत्रसामग्री बसविणे आदी कामे सुरू आहेत. साधारणपणे डिसेंबर अखेरपर्यंत बांधकाम पूर्ण करण्यात येणार असून या ९०० खाटांच्या रुग्णालयासाठी सुमारे १०७८ नवीन पदांची भरती करण्यात येणार आहे. जिल्हा रुग्णालयाचे बांधकाम पूर्ण करतानाच अद्ययावत यंत्रसामग्री बसविण्यावर भर देण्यात यावा. मंत्रालयात या रुग्णालयाच्या कामाचा आढावा घेण्यासाठी दर मंगळवारी बैठक घेण्याचे निर्देश उपमुख्यमंत्र्यांनी प्रधान सचिव श्री. सोना यांना दिले. हे जिल्हा रुग्णालय ठाणे जिल्ह्यासोबतच रायगड, नवी मुंबई, पालघर याभागातील नागरिकांसाठी वरदान ठरेल, असेही उपमुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी यावेळी सांगितले. दरम्यान, ठाणे जिल्हा रुग्णालयाचा आढावा घेतानाच राज्यातील महापालिका रुग्णालयामध्ये महिलांच्या आरोग्य तपासणीची मोहिम हाती घेण्याचे निर्देश उपमुख्यमंत्र्यांनी दिले. महिलांमध्ये स्तनाचा कर्करोग, गर्भाशयाचा कर्करोग याविषयी जागृती वाढावी आणि उपचारापेक्षा प्रतिबंध यावर भर देण्यासाठी ही तपासणी मोहीम घेण्याचे निर्देश त्यांनी दिले. राज्यातील आरोग्य केंद्रांची स्थिती, त्यांना लागणारी औषधे, साहित्यसामग्री याच्या आढाव्यासाठी आरोग्यमंत्री, सचिवांनी अचानक भेटी देऊन पाहणी करण्याचेही उपमुख्यमंत्र्यांनी सांगितले.

# बालरंगभूमी परिषदेचा शिवरायांच्या गौरवशाली इतिहासावर आधारित 'इतिहास महाराष्ट्राचा' उपक्रम

## बीडमध्ये १२ ऑगस्टला प्राथमिक फेरी ; अंतिम फेरी मुंबईत २३ व २४ ऑगस्टला




**बीड । प्रतिनिधी**

छत्रपती शिवाजी महाराजांचा तेजस्वी इतिहास लहान मुलांपर्यंत पोहोचवण्याच्या उद्देशाने बालरंगभूमी परिषदेने 'इतिहास महाराष्ट्राचा' हा विशेष उपक्रम सुरू केला आहे. या उपक्रमाअंतर्गत शिवजन्मोत्सव ते शिवराज्याभिषेक या कालखंडातील महत्त्वाच्या घटनांचे सादरीकरण नृत्य, नाट्य, संगीत, चित्रकला, शिल्पकला आणि इतर कला प्रकारांद्वारे करण्यात येणार आहे. या उपक्रमाची प्राथमिक फेरी बीडमध्ये दि.१२ ऑगस्ट २०२५ रोजी होणार असून अंतिम फेरी २३ व २४ ऑगस्ट २०२५ रोजी मुंबईत पार पडणार आहे. ही माहिती बालरंगभूमी परिषदेच्या अध्यक्षा नीलम शिर्के-सामंत, बीड जिल्हाध्यक्षा डॉ. दीपा क्षीरसागर आणि प्रमुख कार्यवाह योगेश शुक्ल यांनी दिली.

या स्पर्धेचे आयोजन महाराष्ट्रातील सर्व शाखा स्तरावर करण्यात आले आहे. स्पर्धा एकल आणि समूह अशा दोन गटांमध्ये होणार आहे. एकल गटामध्ये वयोगट १ व २ मधून प्रत्येकी प्रथम व द्वितीय क्रमांकाचे स्पर्धक, तसेच समूह गटातून दोन संघ अंतिम फेरीसाठी निवडले जाणार आहेत. एकल गट १: स्पर्धकांनी स्वतः छत्रपती शिवाजी महाराज किंवा त्याकाळातील अन्य व्यक्तिमत्त्वांचे सादरीकरण ५ मिनिटांत करावे. एकल गट २ व समूह गट: शिवजन्मोत्सव ते राज्याभिषेक दरम्यानच्या घटनांचे १० मिनिटांपर्यंत सादरीकरण अपेक्षित असून, यामध्ये ४ ते ८ बालकलावंतांचा सहभाग असावा. विविध कला प्रकारांचा समन्वय असावा. प्रत्येक सादरीकरणासाठी वाद्यवृंद, नेपथ्य, रंगभूषा आणि वेशभूषेची जबाबदारी संबंधित स्पर्धकांची असेल. आयोजकांकडून फक्त ध्वनी व प्रकाशयोजनेची सुविधा दिली जाईल. स्पर्धेचे निकाल अंतिम व बंधनकारक असतील. प्राथमिक व अंतिम फेरीतील सर्व सहभागी आणि विजेत्यांना प्रशस्तीपत्र देण्यात येणार आहे. स्पर्धेसाठी नाव नोंदणीची अंतिम तारीख ८ ऑगस्ट असून, अधिकाधिक शालेय विद्यार्थ्यांनी या उपक्रमात सहभागी व्हावे, असे आवाहन बालरंगभूमी परिषदेचे बीड जिल्हा पदाधिकारी डॉ. संजय पाटील देवळाणकर, स्नेहल पाठक, विलास सोनवणे, अनुराधा चिंचोलकर, मिलिंद शिवनीकर, दीपक जमदाडे, दुष्यंता राम टेके, नामदेव साळुंखे, सुरेश साळुंखे, विजय राख, राहुल सोनवणे, असलम शेख, अमित गाढे, बालासाहेब कांबळे, रोहित पुराणिक, दीपक गिरी यांनी केले आहे.

# युनिटी ऑफ मूलनिवासी समाज यांच्या वतीने अंबाजोगाईत 2 ऑगस्ट रोजी विशेष जिल्हा सम्मेलनचे आयोजन

## विविध विषयांवर मौलिक चिंतन ; उपस्थित रहाण्याचे आवाहन

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

युनिटी ऑफ मूलनिवासी समाज यांच्या वतीने अंबाजोगाईत शनिवार, दिनांक २ ऑगस्ट रोजी विशेष जिल्हा सम्मेलनचे आयोजन करण्यात आले आहे. या सम्मेलनात विविध विषयांवर मौलिक चिंतन, चर्चा होणार आहे. तरी या सम्मेलनात बीड जिल्ह्यातील मूलनिवासी समाजाने उपस्थित राहून सहभागी व्हावे असे आवाहन गोविंद सोन्नर (राज्य महासचिव, युनिटी ऑफ मूलनिवासी समाज, महाराष्ट्र) यांनी केले आहे.

युनिटी ऑफ मूलनिवासी समाज, बीड यांच्या वतीने प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात म्हटले आहे की, राजमाता अहिल्याबाई होळकर त्रिशताब्दी जयंती वर्ष, जोशी वतन बिल, आरक्षण दिन, साहित्यरत्न अण्णा भाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त आणि दुसरे महाराष्ट्र राज्य अधिवेशनच्या तयारी अंतर्गत - अंबाजोगाई शहरात शनिवार, दिनांक २ ऑगस्ट रोजी वेळ : सायंकाळी ६ ते ९.३० वाजेपर्यंत पत्रकार भवन, नगरपरिषद, अंबाजोगाई (जि.बीड.) या ठिकाणी विशेष जिल्हा सम्मेलन आयोजित करण्यात आले आहे. सम्मेलनाचे उद्घाटक म्हणून ॲड.किशोर गिरवलकर (ओबीसी आंदोलनाचे वरिष्ठ मार्गदर्शक) तर अध्यक्षस्थानी कमलाकांत काळे (राष्ट्रीय अध्यक्ष, युनिटी ऑफ मूलनिवासी समाज) हे असणार आहेत. यावेळी अखिल खतीब (जमियत-ए-उलेमा मराठवाडा संघटक), रामकिसन मस्के (ज्येष्ठ मार्गदर्शक, मराठा सेवा संघ, बीड), इंजि.प्रभाकर कांबळे (आंबेडकरी चळवळीचे अभ्यासक), भगवान गडदे (अध्यक्ष, स्वामी विवेकानंद पतसंस्था, अंबाजोगाई.), डॉ.योगेश सुरवसे (ज्येष्ठ अधिव्याख्याता, डायट, अंबाजोगाई), रवी वत्सला वामन आडे (प्रसिद्धीप्रमुख, गोर सेना), मधुकर सुरवसे (तालुकाध्यक्ष, नाभिक महामंडळ, अंबाजोगाई.), बिबिषण चाटे (वंचित बहुजन युवा, जिल्हा महासचिव, बीड.), नवनाथ चौरे (अहिल्याबाई होळकर जयंती उत्सव समिती, अंबाजोगाई), अमोल काळे (ज्येष्ठ शिक्षक, गेवराई), लक्ष्मण वैराळ (बहुजन आंदोलन अभ्यासक, परळी) या मान्यवरांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. यावेळी पुढील विषयांवर मौलिक चिंतन आणि चर्चा होणार आहे. विषय - १) जाती जनगणना, एनपीआर आणि अनुसूचित जाती - जनजाती आरक्षणातील उपवर्गीकरण शासक वर्गाची भूमिका - एक गंभीर विश्लेषण, २) एनपीआर हीच खरी एनआरसी !, आणि ३) स्वर्णिम भारताच्या पुनर्निर्मितीमध्ये विद्यार्थी, युवा, महिला आणि बुद्धिजीवी वर्गाची भूमिका अर्थात मूलनिवासी बहुजन समाजाच्या सामाजिक, सांस्कृतिक ध्रुवीकरणा शिवाय ब्राह्मणी धार्मिक ध्रुवीकरणाचा मुकाबला करता येणार नाही.

# मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून, मराठवाड्यात ३ हजार रुग्णांना २५ कोटींची मदत

## आरोग्य शिबिरातून १२हजार नागरिकांना दिलासा

**छ.संभाजीनगर । प्रतिनिधी**

राज्यातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल व गरीब रुग्णांसाठी मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्ष हा मोठा आधार बनला आहे. विशेषतः मराठवाडा विभागात जानेवारी ते जून२०२५या अवघ्या सहा महिन्यांत तब्बल३हजार३९रुग्णांना२५कोटी५८लाख ३१हजार रुपयांची वैद्यकीय मदत करण्यात आली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या दूरदृष्टीतून नागरिकांचा विचार करून जिल्हा कक्ष स्थापन करण्यात आले. त्यातून लाभार्थी नागरिकांची संख्या वाढली. त्यासोबतच आरोग्य शिबिर व रक्तसंकलन आदी उपक्रम प्रभावीपणे राबविणे सहज शक्य होत आहे, असेमुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रूग्णालय मदत कक्ष प्रमुख रामेश्वर नाईक यांनी सांगितले.

# कष्टकऱ्यांच्या पदराला सन्मानाची साडी; अण्णाभाऊंच्या जयंतीनिमित्त मन जिंकणारा उपक्रम

**बीड । प्रतिनिधी**

क्रांतीशील विचारवंत लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त बीड शहरात एक अत्यंत प्रेरणादायी उपक्रम राबविण्यात आला. कष्टकरी आणि श्रमिक महिलांच्या सन्मानार्थ आयोजित या कार्यक्रमात तब्बल पाचशे महिलांना साडी-वाटप करण्यात आले. त्यामुळे समाजात साहित्य सम्राट अण्णाभाऊ साठे सार्वजनिक जयंती उत्सव समिति



बीड शहरने एक आदर्श निर्माण करून दिला आहे.असे विचार मान्यवरांनी व्यक्त केले.

बीड शहरात दि.२८ जुलै ते १ ऑगस्ट या कालावधीत साहित्य सम्राट गौरव महोत्सव साजरा होतो आहे. त्या अनुषंगाने सोमवार (दि.२८) रोजी चांदणे वाडा येथे साडी वाटपाचा उपक्रम आयोजित करण्यात आला होता. अध्यक्ष म्हणून डॉ.सारिकाताई क्षीरसागर, प्रेमलताताई चांदणे, जयश्रीताई विधाते, जयंतीचे मार्गदर्शक अजिंक्य चांदणे, सुभाष लोणके,अशोक सोनवणे ,केशव लोंढे,जयंती समिती सचिव सुनील पाटोळे,पोपट मिसाळ, सुधाकर धुरंदरे, आनंद चांदणे आदी उपस्थित होते.

यावेळी मान्यवर म्हणाले की, खऱ्या अर्थाने श्रमदान करणाऱ्या आणि आयुष्याची लढाई मोठ्या खंबीरपणे लढणाऱ्या महिलांच्या सन्मानार्थ हा उपक्रम घेण्यात आला. या उपक्रमामागे अण्णाभाऊ साठेंच्या विचारांची प्रेरणा आहे. त्यांनी आपल्या साहित्य, गीत आणि लेखनातून श्रमिकांचे दुःख, स्वप्नं आणि संघर्ष जगासमोर मांडले.

# नवी मुंबई येथे होणाऱ्या राज्यस्तरीय अजिंक्यपद कराटे स्पर्धेसाठी जिल्हास्तरीय निवड चाचणी

**बीड । प्रतिनिधी**

महाराष्ट्र कराटे असोसिएशनच्यावतीने नवी मुंबई येथे सीनियर गटाचे मुले व मुली यांच्या राज्यस्तरीय अजिंक्यपद कराटे स्पर्धा घेतल्या जाणार आहेत. या स्पर्धा १० ऑगस्ट २०२५ रोजी होणार असून या राज्यस्तरीय स्पर्धेमध्ये बीड जिल्हा संघ सहभागी होण्यासाठी बीड जिल्हा स्पोर्ट कराटे असोसिएशनच्या वतीने जिल्हास्तरीय निवड चाचणीचे आयोजन करण्यात आले आहे. ही निवड चाचणी दि.३१ जुलै २०२५ रोजी कालिका नगर बीड येथे घेतली जाणार आहे. या निवड चाचणीमध्ये बीड जिल्हा स्पोर्ट कराटे असोसिएशन यांच्याशी संलग्न असणारे तालुके व क्लासेस चे खेळाडू या निवड चाचणी मध्ये सहभागी होऊ शकतील यासाठी जिल्हा संघटने कडे ३० जुलै पर्यंत नाव नोंदणी करणे आवश्यक राहील. नाव नोंदणी केलेले खेळाडूच निवड चाचणी मध्ये भाग घेऊ शकतील. अधिक माहितीसाठी जिल्हा संघटनेचे सचिव रामदास गिरी यांच्याशी ९८८११५९६० संपर्क साधावा असे आवाहन करण्यात येत आहे.

# राजिप उच्च प्राथ.वडगाव शाळेची दिल्ली भरारी

## राज्यस्तरीय MIEPA व राष्ट्रीय NIEPA नवी दिल्ली च्या पोर्टल वर यशोगाथा

**रायगड । प्रतिनिधी**

रायगड जि. प. ची खालापूर तालुक्यातील उच्च प्रथमिक , वडगाव शाळा कायम आपल्या विविध व नावीन्यपूर्ण उपक्रमाने कायम चर्चेत असते.या उपक्रमांची दखल महाराष्ट्र राज्य शैक्षणिकनियोजन व प्रशासन MIEPA या संस्थेने घेत वडगाव शाळेची यशोगाथा आपल्या पोर्टलवर प्रकाशित केली आहे. तसेच या शाळेच्या यशोगाथेची दखल राष्ट्रीय शैक्षणिक नियोजन व प्रशासन NIEPA या संस्थेने घेतली असून आपल्या राष्ट्रीय पोर्टलवर शाळेची यशोगाथा https://ncsl.niepa.ac.in/schoolleadershipacademy/maharashtra/maharashtra_repository_case_study.php वरील लिंकवर प्रकाशित केली आहे.यात शाळा गैरहजर विद्यार्थ्यांच्या दारी,भात लावणी,स्वीप अंतर्गत मतदार जनजागृती,एक पेड माँ के नाम,चला वाचूया वाचन चटई, रिडींग गार्डन,भाषा,गणित प्रयोगशाळा,बिर्ला कार्बन कडून रंगरंगोटी,अल्काईल अमाईन्स कडून



संगणक व विज्ञान कार्यशाळा,मर्क लाईफ सायन्स कडून स्मार्ट ई क्लासरूम ,एक्झॉनमोबिल कडून शैक्षणिक मदत,ज्युबिलीएन्ट कडून मुस्कान किताबघर अनेक व्यावसायिक कंपन्यांकडून शाळेसाठी CSR च्या माध्यमातून कोट्यवधी रुपये शैक्षणिक उठवासाठी शाळेने मिळवून विकास साधला आहे. जिल्हा परिषदेच्या ततत्कालीन शिक्षणाधिकारी पुनीता गुरव, शेडगे साहेब उपशिक्षणाधिकारी,सुनील भोपळे,डायट पनवेलचे प्राचार्य डॉ.इरफान ईनामदार यांचे मोलाचे मार्गदर्शन व सहकार्य लाभले.पंचायत समिती खालापूर यांच्या मार्गदर्शनाखाली शाळा विविध उपक्रमांचे आयोजन करत असते


## जाहीर प्रगटन

**मा. श्री. सय्यद डब्ल्यू.ए. १० वे सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, बीड यांच्या न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक ११०६/२०२५**

**श्रीकिसान वडने वि निरंक**

अर्जदार - १. श्रीकिसान पि. रामभाउ वडने, वय ५७ वर्ष धंदा -शेती रा. वडगांव गुंधा ता. जि.बीड, २. गंगाबाई भ्र. बाबासाहेब नागरगोजे, वय ७७ वर्ष, धंदा-घरकाम रा. सदर, ३. द्वारकाबाई भ्र. शहादेव ढाकणे वय ५१ वर्ष, धंदा -घरकाम, रा. मिरकाळा ता. गेवराई जि.बीड

विरुध्द

गैरअर्जदार :- निरंक

अर्जदार हे भारतीय आहेत

**प्रकरण : बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत**

ज्याअर्थी अर्जदार यांनी मयत नामे पंचफुला भ्र. रामभाउ वडने यांचे वारस प्रमाणपत्र मिळणेबाबत या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

मयत नामे **पंचफुला भ्र. रामभाउ वडने हे दिनांक २७/०५/२०२५ रोजी रा. वडगाव गुंधा ता. जि. बीड** येथे मयत झालेले आहेत. अर्जदार कं १ हा मयताचा मुलगा आहे. व अर्जदार कं २ व ३ या मयताच्या विवाहित मुली आहते. अर्जदार यांच्याशिवाय मयताचे ईतर कोणीही वारस नाहीत.

अर्जदारांचे असेही म्हणणे आहे की, शासकीय कामासाठी, कार्यालयीन उपयोगाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे म्हणून सदरचा अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे.

त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरील अर्जदार हे मयताचे वारस नाहीत असे कोणास समजावयाचे असेल तर त्यांनी हे प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून एक महिन्याच्या आंत या न्यायालयात हजर होऊन आपली हरकत द्यावी. जर मुदतीत कोणीही हरकत न दिल्यास हे न्यायालय अर्जदाराचे हक्कात त्यांचा हक्काबाबतचा पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना मयताचे वारस असल्याद्दलचे वारस प्रमाणपत्र दिले जाईल याची सर्वांनी नोंद घ्यावी

**पुढील दिनांक १८/०८/२०२५**

आज दिनांक ११/०७/२०२५ रोजी न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**(मार्फत- ॲड. बारगजे एन.ए.)**

**आदेशावरून.**

(स्वाक्षरीत) | शिक्का | (स्वाक्षरीत)

क.लिपीक | | अधिक्षक, दिवाणी न्यायालय व.स्तर, बीड



बीएसआर/फेआयजे/आरएसआर/सीआर/807/2003 दि. 17-7-2003 ☎ (02445) 234608

**शिवरामपुरी ग्रामिण बिगर शेती सहकारी पत संस्था म. विडा ता. केज जि. बीड**

## वार्षिक सर्वसाधारण सभा नोटीस

सर्व सभासद शिवरामपुरी ग्रामिण बिगर शेती सहकारी पतसंस्था म. विडा ता. केज जि. बीड यांना कळविण्यात येते की,संस्थेची २२ वी वार्षिक सर्व साधारण सभा पतसंस्थेचे अध्यक्ष श्री बाबासाहेब अभिमान गुळे यांचे अध्यक्षतेखाली रेणुकामाता कृषी विकास प्रतिष्ठाण सामाजिक सभागृह,अंबळाचे बरड (सारुळ) ता.केज जि. बीड येथे दि. १३-०८-२०२५ बुधवार रोजी दुपारी ठिक १.००वाजता आयोजित केली आहे. तरी सर्व सभासदांनी वेळेवर उपस्थित राहुन उपकृत करावे, ही विनंती.

जा. क्र. : १८०/२०२५-२६ **: सभेपुढील विषय :** नोटीस पाठवल्याचा दिनांक २८/०७/२०२५

१. मागील वार्षिक सर्वसाधारण सभा दि. १३/०८/२०२४ चा वृत्तांत वाचुन कायम करणे.
२. सन २०२४-२०२५ या वर्षाचा संचालक मंडळाने तयार केलेला वार्षिक अहवाल व आर्थिक पत्रके वाचणे व मान्यता देणे.
३. सन. २०२४-२०२५ या वर्षाच्या अंदाज पत्रकास तसेच सन. २०२४-२०२५ वर्षाच्या अंदाज पत्रकास तुलनात्मक खर्चास मान्यता देणे.
४. सन २०२४-२०२५ या वर्षाचा लेखा परिक्षण अहवाल तसेच सन २०२३-२०२४ वर्षाचा लेखा परिक्षण अहवाल व निरसन अहवाल प्रतिवृत्तास मान्यता देणे.
५. सन २०२४-२०२५ वर्षाच्या संचालक मंडळाने केलेल्या नफा विभागणीस मान्यता देणे.
६. सन २०२५-२०२६ साला करिता सवैधानिक लेखा परिक्षकाची नियुक्ती व त्यांना देण्यात यावयाच्या मावेजास मान्यता देणे.
७. पतसंस्था पोटनियत दुरुस्ती
८. एकमुस्त रक्कम कर्ज भरणा करणे बाबतच्या योजनेस अनुसरुन सन २०२४-२५ मधील अनुत्पादक कर्जास तडजोडीने दिलेल्या सुटीस मान्यता देणे याबत चर्चा करणे.
९. पतसंस्थे अंतर्गत कर्मचाऱ्यांना सेवा नियम लागु करणे बाबत मान्यता देणे.
१०. आयत्या वेळी येणारे विषय मा. अध्यक्षांचे पूर्व परवानगीने.

-: स्थळ :-
रेणुकामाता कृषी विकास प्रतिष्ठाण सामाजिक सभागृह अंबळाचे बरड (सारुळ) ता.केज,जि.बीड

- संचालक मंडळाचे आदेशावरुन -
श्रीमती सुनिता लक्ष्मण कदम
मुख्य कार्यकारी अधिकारी
शिवरामपुरी ग्रामिण बिगर शेती सहकारी पतसंस्था म. विडा, ता. केज जि. बीड

टिप:- १. वार्षिक सर्वसाधारण सभेत कांही प्रश्न अथवा सुचना असल्यास दि. ०६/०८/२०२५ पर्यंत पतसंस्थे कडे लेखी कळवावे अन्यथा त्याचा विचार करणे बंधन कारक नाही.
२. पत संस्थे विषयक कांही माहिती अवश्यक असल्यास दि.०६/०८/२०२५ वरील मुदतीत पत संस्थेत उपलब्ध आहे.
३. सभा कोरम अभावी स्थगित झाल्यास तीच सभा त्याच ठिकाणी त्याच विषयावर चर्चेसाठी १ तासानंतर सुरु होईल. त्यास कोरमची आवश्यकता असणार नाही.
४. दि. ३१-०३-२०२५ पूर्वी सभासद असतील त्यांनाच या सभेत भाग घेता येईल.

दैनिक

# मराठवाडा पत्र

महाराष्ट्राचा बुलंद आवाज

• छत्रपती संभाजीनगर • जालना • बीड • परभणी • लातूर • नांदेड • धाराशिव • हिंगोली • अहिल्यानगर

संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे

● जिल्हा विशेष ● बुधवार, दि. ३० जुलै २०२५ ● पान ४



राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीच्या जिल्हा सरचिटणीस पदी बप्पासाहेब घुगे यांची फेरनिवड माननीय माजी मंत्री धनंजय मुंडे साहेब व जिल्हा अध्यक्ष राजेश्वर आबा चव्हाण व विधानसभा अध्यक्ष योगेश क्षीरसागर यांच्या नेतृत्वाखाली बप्पासाहेब घुगे यांची जिल्हा सरचिटणीस पदी निवड केलेली आहे पक्षाचे काम पाहून बप्पा घुगे यांची फेर निवड करण्यात आली आहे.

# 159 कोटींच्या नगररोडचे निकृष्ट काम ; अवघ्या 4 महिन्यांत पडले खड्डे!

**गुणवत्तेवर प्रश्नचिन्हे ; डागडुजी करून प्रकरण दाबण्याचा प्रयत्न ; चौकशी करून कारवाईची मागणी : डॉ. गणेश ढवळे**





● शहरातील सर्वांत महत्त्वाचा, शासकीय कार्यालये आणि नागरी वर्दळीचा रस्ता चार महिन्यांतच खचू लागल्याने संपूर्ण यंत्रणेला धक्का बसला आहे. प्रशासनाकडून केलेली डागडुजी म्हणजे निकृष्ट काम झाकण्याचा केविलवाणा प्रयत्न आहे, असा आरोप करत डॉ. गणेश ढवळे यांनी दोषींवर कठोर कारवाई आणि सखोल चौकशीची मागणी केली आहे. अन्यथा रस्त्यावर उतरून आंदोलन करण्यात येईल, असा इशाराही त्यांनी दिला.

बीड । प्रतिनिधी

शहरातील मुख्य शासकीय कार्यालयांना जोडणाऱ्या नगररोडच्या २४.५ किलोमीटर लांबीच्या रस्त्याचे काम जून २०२४ मध्ये सुरू झाले. तब्बल १५९ कोटी रुपये खर्च करून हे काम अंतिम टप्प्यात आलेले असतानाच, अजून पूर्णही न झालेले रस्ते फक्त चार महिन्यांतच खचू लागले असून अनेक ठिकाणी मोठमोठे खड्डे पडले आहेत. विशेषतः जिल्हाधिकारी कार्यालयासमोरच रस्त्यावर खड्डे पडल्याने नागरिकांत संतापाची लाट पसरली आहे. प्रशासनाने तातडीने डागडुजी करून विषय थोपवण्याचा प्रयत्न केला असला, तरी कामाच्या निकृष्ट दर्जावर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. या प्रकरणी सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे यांनी जिल्हाधिकारी बीड आणि महाराष्ट्र राज्य महामार्ग प्राधिकरणाच्या कार्यकारी अभियंत्यांकडे लेखी तक्रार दाखल केली असून, दोषींवर कठोर कारवाईसह सखोल चौकशीची मागणी केली आहे. अन्यथा आंदोलनाचा इशाराही त्यांनी दिला आहे.

कामात विलंब, दंड ठोठावूनही नाही सुधारणा– हे रस्ते काम राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण (NHI) अंतर्गत साकेत कन्स्ट्रक्शन या कंपनीला दिले असून, डिसेंबर २०२४ ही अंतिम मुदत निश्चित करण्यात आली होती. मात्र वेळेत काम पूर्ण न झाल्याने आता नोव्हेंबर २०२५ ही नवीन डेडलाईन दिली आहे. कामाच्या विलंबाबाबत तत्कालीन जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनी साकेत कन्स्ट्रक्शन कंपनीवर १ कोटी रुपयांचा दंडही ठोठावला होता. तरीदेखील कामाच्या गतीत किंवा गुणवत्तेत कोणतीही सुधारणा झालेली दिसून येत नाही.

## शाळेमध्ये घुसून गुंडगिरी करणारे अटक: बीड शहर पोलिसांची कामगिरी

बीड । प्रतिनिधी

सावरकर प्राथमिक विद्यालयाच्या आवारात शाळेतील दोन मुलांच्या एकमेकांमधील किरकोळ भांडणाचे कारणामुळे पाथरूड गल्लीतील काही मुलांनी शाळेमध्ये घुसून मुलास आणि मुलाच्या पालकाला मारहाण केली होती. बीड शहर पोलिसांनी घटनेचे गांभीर्य ओळखून १५ आरोपींविरुद्ध तात्काळ गुन्हा दाखल करून घेतला होता.

▶▶ उर्वरित पान २ वर



## शेतकऱ्यांचे ठिबक फळबागांचे पैसे रखडले ; कृषी विभाग शेतकऱ्यांना कधी पैसे देणार ?

बीड । प्रतिनिधी

केंद्र आणि राज्य सरकारच्या संयु३त विद्यमाने शेतकऱ्यांसाठी विविध योजना सुरू करण्यात आलेल्या आहेत. शेतकरी अनुदानाचे राज्यभरात ४८ लाख अर्ज पेंडिंगमध्ये पडले असून अद्यापही निकाली काढण्यात आलेले नाहीत. यासाठी ४४ हजार कोटी रुपयांची आवश्यकता आहे. बीड जिल्ह्यातीलही हजारो शेतकऱ्यांचे पैसे पेंडिंगमध्ये पडले आहेत. त्यांना पैसे कधी मिळणार? असा प्रश्न उपस्थित होत आहे.

सुक्ष्मसिंचन, फलोत्पादन, यांत्रीकीकरण, शेततळे, हरितगृह, शेडनेट, कांदाचाळ यासाठी केंद्र आणि राज्य सरकारच्या संयु३त विद्यमाने शेतकऱ्यांना अनुदान दिले जाते. राज्यात शेतकरी अनुदानासाठी ४८ लाख अर्ज आलेले आहेत. हे अर्ज अजूनही निकाली काढण्यात आलेले नाहीत. यासाठी ४४ हजार कोटी रुपयांची आवश्यकता आहे. यांत्रिकीकरणातून २६ लाख तर सुक्ष्मसिंचनासाठी सव्वाचार लाख, फलोत्पादनासाठी साडेसतरा लाख अर्ज आलेले आहेत.

## सेवाजेष्ठता डावलून केंद्रप्रमुख झालेल्यांना शिक्षण विस्तार अधिकारी (जे.) पद हवे

बीड । प्रतिनिधी


सन २०१३-१४ या काळात बीड जिल्ह्यामध्ये अनेक पदोन्नत्या ह्या अनाधिकृत व बेकायदेशीर तसेच सेवाजेष्ठता डावलून झाल्या होत्या. त्यात केंद्रप्रमुख सुध्दा होते. त्या केंद्रप्रमुखांना त्यांच्या आदेशात तात्पुरत्या स्वरुपात, अभावीतपणे नियुक्त्या दिल्या होत्या. त्यापुढे दिनांक १२/०७/२०१५ रोजी रद्द केल्या होत्या. पुढे तेच जे अनाधिकृतपणे केंद्रप्रमुख झाले होते. त्यांनी पुढे अपील केले होते. आता त्यातील काही जणांना जेष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी पदी पदोन्नती हवी आहे असे प्रसिध्दीस दिलेल्या पत्रकात बहुजन विकास मोर्चाचे जिल्हाध्यक्ष प्रशांत ससाणे यांनी म्हटले आहे.

पत्रकात प्रशांत ससाणे यांनी पुढे म्हटले आहे की, सदरील प्रकरण हे पुन्हा अप्पर आयुक्ताकडे गेले. त्यांनी ते प्रकरण फेटाळून लावले कारण त्यांना तात्पुरती अभावितपणे पदोन्नती दिली होती. नैतिकतेच्या आधारे ते प्रकरण त्यांनी तिथेच सोडणे आवश्यक होते. पण तसे न करता त्यांचा जो कर्ताधर्ता आहे तो या प्रकरणातून गेला त्याला यांचे छक्के पंजे माहित होते. म्हणून त्यांनी त्या केंद्रप्रमुखांना मागदर्शन केले असावे. त्यामुळे ते प्रकरण उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद यांच्याकडे रिट दाखल केली म्हणजे अनाधिकृत असता अधिकृत करण्याचा प्रयत्न केला. त्याबाबत मा. उच्च न्यायालयाने याबाबत पुन्हा हे प्रकरण निकाली काढण्यासाठी अप्पर आयुक्ताकडे वर्ग केले. पुढे हे अप्पर आयुक्ताकडे तिथेही हे प्रकरणात पुढे तोच निर्णय दिला होता. तो त्यांनी अगोदर दिला होता. त्यानुसार अवमान याचिका दाखल केली व न्यायालयीन निकालाच्या अधीन राहून तात्पुरत्या स्वरुपात पदोन्नती

▶▶ उर्वरित पान २ वर

## श्री क्षेत्र गोरक्षनाथ टेकडी येथे किसन बाबा यांच्या पुण्यतिथी निमित्त सप्ताहाचे आयोजन

### गुरुवर्य शांतीब्रह नवनाथ बाबा महाराज यांच्या मार्गदर्शना खाली भव्य कार्यक्रम पार पडणार



बीड । प्रतिनिधी

विसाव्या शतकातील महान संत सद्गुरु किसनबाबा महाराज श्री क्षेत्र गोरक्षनाथ टेकडी यांच्या २७ व्या पुण्यमारणार्थी श्री क्षेत्र गोरक्षनाथ टेकडी येथे अखंड हरिनाम सप्ताह आयोजन ह.भ.प. शांतीब्रम्ह गुरुवर्य श्री नवनाथ बाबा महाराज यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली श्री क्षेत्र गोरक्षनाथ टेकडी येथे दि. ०२ ऑगस्ट शनिवार रोजी आरंभ होणार आहे.

दि. ०२ ऑगस्ट शनिवार रोजी दीप प्रज्वलन ह.भ.प. महंत शिवाजी महाराज श्री क्षेत्र नारायणगड, ह.भ.प गोपाळ म. शास्त्री पोखरी, ह.भ.प उद्धव म. चोले खडकी, कलश पूजन ह.भ.प महादेव महाराज श्री क्षेत्र चाकरवाडी, ह.भ.प महादेव महाराज राऊत जवळा, ह.भ.प. भागवत म. पुरी श्री क्षेत्र पंचमुखेश्वर भाटेपुरी, गुरूची प्रतिमा पूजन: ह.भ.प शांतीब्रम्ह माठाधिपती नवनाथ बाबा महाराज, गाथा पूजन, ज्ञानेश्वरी पूजन, टाक पूजन,

▶▶ उर्वरित पान २ वर

## थोडक्यात

### जिल्हास्तरीय लोकशाही दिन ०४ ऑगस्टला

बीड । प्रतिनिधी

जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय लोकशाही दिनाचे आयोजन सोमवार, ४ ऑगस्ट रोजी सकाळी १० ते दुपारी १२ या वेळेत जिल्हाधिकारी कार्यालयात करण्यात आले आहे. अर्जदाराने विहित नमुन्यातील अर्ज १५ दिवस अगोदर दोन प्रतीत सादर करणे आवश्यक आहे. लोकशाही दिनासाठी अर्ज देताना संबंधित तालुक्यातील तिसऱ्या सोमवारी तालुकास्तरीय लोकशाही दिनामध्ये अर्ज दिलेला असावा. तालुकास्तरीय लोकशाही दिनात एक महिन्यापेक्षा जास्त कालावधी होऊन देखील कोणतीही कार्यवाही झालेली नसावी, अशाच अर्जदारांनी टोकन क्रमांकाच्या पावतीसह अर्ज दोन प्रतीत सादर करावा. लोकशाही दिनामध्ये न्यायप्रविष्ट प्रकरणे, राजस्व, अपील, सेवाविषयक, आस्थापनाविषयक बाबी, विहित नमुन्यात नसणारे व आवश्यक ती कागदपत्रे न जोडलेले अर्ज स्वीकारण्यात येणार नाहीत. तालुकास्तरीय लोकशाही दिनातील टोकन क्रमांकाची तहसीलदार यांच्या स्वाक्षरीची पोहोच पावती, दिलेल्या मुदतीत व नमुन्यात ज्यांनी यापूर्वीच्या आवश्यक कागदपत्रासह अर्ज केले असतील त्यांना तक्रार मांडता येईल, असे जिल्हाधिकारी कार्यालयाने कळवले आहे.

### शासकीय तंत्र प्रशाला येथे द्विलक्षी अभ्यासक्रम प्रवेशास सुरुवात

बीड । प्रतिनिधी

येथील शासकीय तंत्र प्रशाला केंद्र तथा कनिष्ठ महाविद्यालय, बीड (शासकीय आयटीआय परिसर) येथे इयत्ता ११ वी मध्ये प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांकरिता द्विलक्षी अभ्यासक्रमातील ऐच्छिक विषय घेण्यासाठी प्रवेश प्रक्रिया सुरु झालेली आहे. या अंतर्गत इलेक्ट्रिकल मेंटेनन्स, स्कूटर मोटर सायकल सर्व्हिसिंग व मेकानिकल मेंटेनन्स या विषयांपैकी एक विषय ऐच्छिक निवडता येतो. सदरील विषय हा एकुण २०० गुणांचा असून त्यापैकी प्रात्यक्षिक परीक्षेचे १२० गुण व थेअरी परीक्षेचे ८० गुण असतात. हे विषय इंजिनिअरींग क्षेत्रामध्ये करिअर घडवू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी अतिशय उपयुक्त असून, यामुळे इयत्ता १२ वी परीक्षेत जास्तीत जास्त गुण मिळविणे शक्य आहे तसेच या इंजिनिअरींग ग्रुपच्या विषयामुळे त्यांना इंजिनिअरींगचे मुलभूत ज्ञान प्राप्त होते व त्याचे महत्व लक्षात येऊन आवड निर्माण होते. हे विषय घेण्यासाठी बीड तालुक्यातील कोणत्याही महाविद्यालयात इयत्ता ११ वी तील प्रवेशित विद्यार्थी विहित नमुन्यात अर्ज करु शकतात. तरी इच्छुक विद्यार्थ्यांनी प्रवेश घेण्यासाठी शासकीय तंत्र प्रशाला केंद्र तथा कनिष्ठ महाविद्यालय, बीड (शासकीय आयटीआय परिसर) येथे संपर्क साधावा. तसेच सविस्तर माहितीसाठी खालील मोबाईल क्रमांकावर संपर्क साधावा.जी.पी.गवळी – ९४२१६१०९०१,एस.म हिंद्रकर – ८६६८५७०८९९, डी.टी.गायकवाड – ९८८१४५१७५० यांच्याशी असे आवाहन शासकीय तंत्र प्रशाला केंद्र तथा कनिष्ठ महाविद्यालय, मुख्याध्यापक/प्राचार्य यांनी केले आहे.

### अरणविहीरा येथे अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन

आष्टी । प्रतिनिधी

तालुक्यातील अरणविहीरा येथे अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. मंगळवार २९/०७/२०२५ ह.भ.प. राम महाराज घुले,बुधबार ३०/०७/२०२५ ह.भ.प. ईश्वर महाराज नवसुपे (केडगाव), गुरुवार ३१/०७/२०२५, ह.भ.प. किशोर महाराज म्हस्के (आळंदी), शुक्रबार १/०८/२०२५ ह.भ.प. प्रांजलताई जाधव (कर्जत), शनिबार २/०८/२०२५ ह.भ.प. ज्ञानेश्वर महाराज कराळे,रविवार ३/०८/२०२५ ह.भ.प. आदिनाथ महाराज आंधळे, सोमवार ४/०८/२०२५, ह.भ.प. राजाराम महाराज शास्त्री (मजले चिंचोली), मंगळवार ५/०८/२०२५ ह.भ.प. गुरुवर्य बाळकृष्ण महाराज बालवडकर यांची किर्तन सेवा होणार आहे. तसेच काल्याचे किर्तन हभप गुरूवर्य बाळकृष्ण महाराज बालवडकर यांच्या हस्ते बुधवार दि ६/८/२०२५ रोजी सकाळी ८ ते १० या वेळेत होणार आहे. तरी पंचक्रोशीतील भाविक भक्तांनी उपस्थित राहावे असे आवाहन अरणविहीरा ग्रामस्थांनी केले आहे.



### सौ.के.एस.के महाविद्यालयात संपूर्ण आरोग्य तपासणी व आयुर्वेदिक उपचार संपन्न

बीड । प्रतिनिधी

येथील नवगण शिक्षण संस्थेचे सौ.केशरबाई सोनाजीराव क्षीरसागर उर्फ काकू कला,विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना आणि हेल्थ सेंटर यांच्या वतीने युनिकेअर हेल्थ सेंटर,ठाणे यांच्या वतीने महाविद्यालयातील कर्मचार्यांची संपूर्ण तपासणी करण्यात आली. त्यात मधुमेह,रक्तदाब, नाडी परिक्षण,डॉक्टर सल्ला, वैयक्तीक आहार सल्ला,योगा मार्गदर्शन,बीएम आय, प्रकृती निदान, संपूर्ण बॉडी ॲनालिसीसव ब्लड टेस्ट करण्यात आले.

## सन उत्सवातून मानवी संस्कृतीचा प्रसार होतो : नगरसेवक ॲड विकास जोगदंड

**नागपंचमी निमित्त श्री क्षेत्र नागोबा देवस्थान च्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या महाप्रसादाचा हजारो भाविक भक्तांनी घेतला लाभ**

बीड । प्रतिनिधी

विश्वातील विविध देशातील विविध संस्कृतींमध्ये पारंपारिक नागपूजा प्रचलित असून भारतीय संस्कृती निसर्ग व कृषी प्रधान आहे त्यात वृक्ष, प्राणी इतर निसर्गाच्या रुपांना पूजनीय मानून त्यांच्या कृतज्ञतापर आपल्या भारतीय संस्कृतीमध्ये नागपूजा करण्यात येते. बुद्धकालीन नागलोक नागपंचमीनिमित्त नागोत्सव साजरा करत होते. सर्व धर्मात सर्प राजास पूजनीय मानतात शेतीचं



रक्षण करणारा रक्षणकर्ता म्हणून देखील शेतकरी बांधव नागदेवतेची मनोभावे पूजा करतात.अशा पारंपारिक सन उत्सवातून मानवी संस्कृतीचा प्रसार होत असल्याचे प्रतिपादन भिम स्वराज्य सेनेचे संस्थापक/अध्यक्ष तथा नगरसेवक ॲड विकास जोगदंड यांनी नागोबा गल्ली पेठ बीड येथे सर्व धर्मीयांचे श्रद्धास्थान असलेले नागोबा मंदिर येथे नागपंचमी निमित्त आयोजित करण्यात आलेल्या नागोत्सव कार्यक्रमाप्रसंगी बोलतांना व्यक्त केले. नागोबा गल्ली येथे सर्व धर्मियांचे श्रद्धास्थान नागोबा चे मंदिर असून हे मंदीर पुरातन आहे तसेच दरवर्षी येथे नागपंचमी निमित्त नागोत्सव साजरा करण्यात येतो. श्री क्षेत्र नागोबा देवस्थान च्या वतीने महाप्रसादाचे आयोजन देखील करण्यात येते. या महाप्रसादाचा लाभ हजारो भाविक भक्त घेतात. सर्व धर्मांचा तसेच सर्वांच्या श्रद्धेचा सन्मान करणे हाच या मागचा निखळं उद्देश असून मानवी निती मूल्य

▶▶ उर्वरित पान २ वर